महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम-३ मधील तरतूदींच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांमार्फत देण्यात येणा-या सेवांमधील एक सेवा वगळण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

## शासन निर्णय क्र.-संकीर्ण-२०१६/प्र. क्र.६८/समन्वय

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई.

दि. २८ नोव्हेंबर, २०१७.

**संदर्भः**- १) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३१)

२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.संकीर्ण-२०१५/ प्र. क्र.५३/ समन्वय, दि.२४/११/२०१५.

३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.संकीर्ण-२०१६ /प्र. क्र.६८/समन्वय, दि.२८/९/२०१६.

**प्रस्तावना: -**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ च्या कलम ३ अन्वये सार्वजनिक प्राधिकरणाने अधिनियम लागू झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीत आणि वेळोवेळी पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा अधिसूचित करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांमार्फत देण्यात येणाऱ्या ११ सेवा अधिसूचित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

विभागाने यापूर्वी दि. २४/११/२०१५ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती/ जमाती अत्याचारास बळी पडलेल्या सदस्यांना अर्थसहाय्य या योजनेचा समावेश करण्यात आला आहे. सदर योजनेअंतर्गत लाभ मिळविण्यासाठी अर्जदारास ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. तथापि, पिडीताला कोणतीही औपचारीकता न पाळता तातडीने मदत देणे आवश्यक आहे. सबब योजनेचे स्वरूप तसेच वरील बाबी विचारात घेता, सदर योजना ही महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कलम ३ मधून सेवा वगळण्याचा विचार शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय:-

अनुसूचित जाती/ जमाती अत्याचारात बळी पडलेल्या सदस्यांना अर्थसहाय्य ही सेवा विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.५३/समन्वय, दि.२४/११/२०१५ च्या महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या कलम ३ मधून वगळण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१२१३१३५०४५९८२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Amrutrao Zalte

Digitally signed by Siddharth Amrutrao Zalte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dc54b49c6f5c903027053476b3a6ef50b46ff44a7e8b820fef7bfdd100c56194, cn=Siddharth Amrutrao Zalte
Date: 2017.12.13 14:49:39 +05'30'

**( सि. अ. झाल्टे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
२. सर्व सन्माननिय विधानसभा/विधानपरिषद सदस्य.
३. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा. मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय (पत्राने)
७. मा. मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय (पत्राने)
८. मा. राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय.
९. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व विभागीय आयुक्त
१२. आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१३. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे
१४. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे.
१५. सर्व जिल्हाधिकारी
१६. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, द्वारा- आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१७. सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, द्वारा- आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१८. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, द्वारा- आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१९. सर्व मंत्रालयीन विभाग
२०. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील सर्व कार्यासने.
२१. निवड नस्ती (समन्वय).